# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२२६ /२०२४ दि. ०८/११/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत घोडबंदर रोडवर मानपाडा मेट्रो स्टेशनचे काम चालू असल्याने सार्वजनिक वाहतुकीस व रहदारीस अडथळा व वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांची गैरसोय होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे घोडबंदर वाहिनीवरील सर्व्हिस रोडने नागोरी टी मानपाडा कडून तत्वज्ञान कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नागोरी टी मानपाडा कॉर्नरजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने नागोरी टी मानपाडा येथून टिकुजीनीवाडी सर्कल, खेवरा सर्कल, काशिनाथ घाणेकर सर्कल, वसंत विहार सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाणे घोडबंदर वाहिनीवरील सर्व्हिस रोडने दोस्ती इम्पेरिया बिल्डींगचे कॉर्नर जवळून तत्वज्ञान कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दोस्ती इम्पेरिया बिल्डींगचे कॉर्नर जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने दोस्ती इम्पेरिया बिल्डींगचे कॉर्नर जवळून खेवरा सर्कल – काशिनाथ घाणेकर सर्कल – वसंत विहार सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पुढील २ महिन्याकरीता लागू करण्यात येत आहे. याबात काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CS CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :-**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :- सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner




CamScanner